# राशिभविष्य - डिसेंबर, २०२२.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==============================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेला तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.**

==============================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे अनारोग्य होणे, अपमान होणे व त्यातून सूडभावना प्रबळ होणे संभवते. जपा. तसेच येथील वक्री हर्षलमुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी होणे संभवते. तसे घडल्यास कोणाचा धाक, दडपण सहन होणार नाही. असे असले तरी तो शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काही प्रमाणात अनुकुल होणे संभवते. या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून तो अनारोग्यकारक होईल व त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर, चंचल अशी होईल व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत रवि असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, इच्छाआकांक्षा अपूर्ण राहणे, नियोजित कार्यात अपयश येणे, संततिसुखात बाधा येणे तसेच प्रवासात मनस्ताप व मानहानी होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी धनु राशीत प्रथमपासून बुध -शुक्र असे दोन ग्रह आहेतच. पैकी बुध प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे कार्यदिरंगाई होणे, वाद, भांडणे होणे संभवते. पण येथील शुक्र अनुकुल, सुखकारक व लाभदायक होईल. या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत शनि असून तो चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे आर्थिक घोटाळे, आर्थिक नुकसान होणे व काही मंडळींना कुमार्गी मित्रबाधा होण्याची शक्यता दिसते. त्यामुळे नैराश्य येणेही शक्य दिसते. या राशीच्या व्यय स्थानी मीन राशीत गुरु असून तो अध्यात्म व सामाजिक कार्य यांची आवड असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण कौटुंबिक जीवनात

त्याच्यामुळे मनस्ताप व अपेक्षाभंग होणे संभवते. तसेच प्रवासात अडचणी येण्याची शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर “श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा.तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी “ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी “ओम यमाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ** - या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत वक्री मंगळ असून त्याच्यामुळे स्वभाव हट्टी,मानापमान फार असणारा असा घडणे संभवते. त्यामुळे अकारण श्रम, दगदग कराल व शरीरपीडा होईल. या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत तो प्रतिकुल होणेच संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील. आचारविचार उच्च असतील. या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत रवि असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या अष्टम स्थानी धनु राशीत जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होईल, इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील. पण महिन्याच्या पूर्वार्धात तो केंद्रस्थानी असल्याने भाग्योदयकारक होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी धनु राशीत प्रथमपासून बुध -शुक्र आहेतच. ते दोन्ही ग्रह अनुकुल होतील व बुधामुळे कार्यसिद्धी होऊन यशही लाभेल. शुक्रामुळे या राशीच्या काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. शिवाय ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी मकर राशीत शनि असून तो चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना अनुकुल होईल. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर होईल; पण तो मनोवैज्ञानिक आणि द्रव पदार्थ व्यापार असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत गुरु असून तो सर्व प्रकारे अनुकुल, लाभदायक व सुखदायक होईल. विवाहेच्छूना विवाहयोग संभवतो. या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहूमुळे दिखाऊ आचरण होणे संभवते, पण त्याच्यामुळे अर्थलाभ होणेही शक्य दिसते. वक्री हर्षलमुळे आर्थिक समस्या त्रास्त करतील, वाईट प्रसंगाशी मुकाबला करावा लागेल, बेअब्रू होणे संभवते. शिवाय त्याच्यामुळे अपघातभयही असून तो दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल. मुळे सतत सावधानतेने आचरण करा. श्रद्धा असेल तर “श्रीशिवशंकराची व श्री हनुमानाची उपासना

अनुकुल होईल व मन:शक्ती आणि मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने " शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा "चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी "ओम ब्रह्माय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोमसोमाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत केतू असून तो अध्यात्म व गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत रवि असून तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे संभवते. पण तो दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल. हा रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी धनु राशीत जात आहे. त्या काळात तो केंद्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी धनु राशीत प्रथमपासून बुध -शुक्र हे दोन ग्रह आहेतच. येथील शुक्रामुळे या राशीच्या विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. प्रेमिकांचे प्रेमविवाह होणेही संभवते. पण बुध दु:खदायकच होईल व त्याच्यामुळे वाद, भांडणे होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मकर राशीत शनि असून तो दु:ख,दैन्यकारक असून अनारोग्यकारक व अपघातकारक होणे संभवते. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील, तर काही मंडळींना परदेशवारीची संधी मिळेल. शिवाय तो अध्यात्म व उपासना यांची मनापासून ओढ असणारांना प्रगतिकारक होईल. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत गुरु असून तो बौद्धिक नोकरी -व्यवसाय असणारांना व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल व या क्षेत्रातील क्वचित कोणाचा मानसन्मान होणेही संभवते. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत राहू आणि वक्री हर्षल असून येथील राहूमुळे या राशीच्या ज्या मंडळींकडे अधिकार पद आहे अशापैकी काहींना अधिकाराचा गैरवापर करण्याचा मोह अस्वस्थ करील. पण त्यांनी तो मोह कटाक्षाने झटकून टाकावा. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. येथील वक्री हर्षलमुळे सर्व काही अनिश्चित असून त्याच्यामुळे मित्रांशी वाद, भांडणे होणे संभवते. तसेच हितशत्रूचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून तो पूर्णपणे अशुभ असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील. अपमान, मानहानी होणे संभवते. तसेच तो अनारोग्यकारक होणेही शक्य दिसते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व दुर्गादेवीची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती आणि मन:शांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत

स्तोत्रा”चे आणि “श्रीदुर्गादेवी स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी “ओम नमः: शंकराय “ तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:’ तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत केतू असून तो विषभयकारक होईल. जपा. त्याच्यामुळे घरीदारी कोणाशी पटणार नाही. तसेच कसली तरी चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत रवि असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, अपघातभय असणे संभवते. तसेच नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागण्याची शक्यताही दिसते. त्याशिवाय त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनातील सुखात व संततिसुखात बाधा येणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या षष्ठ स्थानी धनु राशीत गेल्यावर अनारोग्यकारक होणार असला तरी दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी धनु राशीत प्रथमपासून बुध -शुक्र हे दोन ग्रह आहेतच. पैकी बुधामुळे नियोजित कार्यसिद्धी होईल, अर्थलाभ होणेही संभवते. येथील शुक्रामुळे कलाक्षेत्रात निपुण असूनही कलागुण प्रकट करण्याची संधीच मिळणार नाही. या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत शनि असून त्याच्यामुळे चित्तवृत्ती शांत राहील; पण या राशीच्या विवाहेच्छूना विवाहयोग संभवत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून तो जलभयकारक व विषभयकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. तसेच तो विषभयकारक असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत गुरु असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे अध्यात्मात रुचि असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच त्याच्यामुळे प्रवासाचे योग येणेही संभवते. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील हर्षल बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. काही मंडळींना बढती, अधिकार पद मिळणेही संभवते. क्वचित कोणाचा सन्मान होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. येथील हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होणार असला तरी तो वक्री असल्याने किती प्रमाणात अनुकुल होईल ते सांगणे कठीण आहे. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून त्याच्यामुळे मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. जपा. त्याशिवाय अर्थप्राप्तीसाठी कठीण कष्ट-परिश्रम करावे लागतील. पण महिनाअखेरीस एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान

झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" तारक मंत्राचा,ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी "ओम बृहस्पतये नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी "ओम सर्पाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत केतु असून तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे दु:ख, मनस्ताप होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत रवि असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी धनु राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे दु:ख, अनारोग्य, अपघात, कौटुंबिक त्रास, नोकरीत वरिष्ठांचा जाच, कार्यदिरंगाई, आर्थिक चिंता अशा प्रकारच्या घटना घडणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी धनु राशीत प्रथमपासून बुध -शुक्र हे दोन ग्रह आहेतच. पण येथील बुधही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे संतती, स्त्रीपासून मनस्ताप दिला जाणे संभवते. पण येथील शुक्र कोणत्याही कलाक्षेत्राची मनापासून आवड असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत शनि असून त्याच्यामुळे वाद, गैरसमज, भांडणे होतील. व शत्रुत्व निर्माण होईल. जपा. त्याशिवाय अनारोग्य होणेही संभवते. पण तो दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा, संकटे येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत गुरु असून त्याच्यामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशांपैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होऊ शकेल. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील राहू फिरतीची नोकरी असणारांना अनुकुल होईल. पण येथील हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काही प्रमाणात अनुकुल व प्रगतिकारक होईल. त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून त्याच्यामुळे नोकरी-व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. नोकरीत कामाचा असह्य
ताण सहन करावा लागेल. व्यवसायात अडचणी येणे संभवते. काही मंडळींना हातची सुखाची नोकरी सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तसा विचारही करू नये. आहे.ती नोकरीच मनापासून करावी. तेच सुखाचे होईल. श्रद्धा असेल तर "श्रीभगवान विष्णूची उपासना" अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "विष्णुसहस्रनाम स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र

मघा आहे त्यांनी “ओम पितराय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी “ओम भगाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत रवि असून महिन्याच्या पूर्वार्धात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे सुखसमाधान लाभेल, आरोग्य उत्तम राहील, नोकरीत वरिष्ठ तुमच्या कामावर खूष होतील, कोणाला बढती मिळेल तर कोणाला सन्मान किंवा एखादे उच्च पद मिळणेही शक्य दिसते. अर्थलाभ होणेही संभवते. हा रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु राशीत जाईल तेव्हा प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक त्रास, दु:ख, आर्थिक चिंता, अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु राशीत प्रथमपासून बुध -शुक्र आहेतच. पैकी बुधामुळे गृहसौख्य व मित्रसुख लाभेल, पण धननाश होणे संभवते. ज्यांची शेतीवाडी आहे अशांना शुक्र अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत शनि असून त्याच्यामुळे बुद्धी संशयी, व्यवहारी व स्वार्थी होणे संभवते. पण त्याच्यात चिकाटीचा गुण असल्याने त्याचा चिकित्सक बौद्धिक कामात उपयोग होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे उगीचच एखादी आजारभावना किंवा काल्पनिक चिंता त्रस्त करील. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत गुरु असून त्याच्यामुळे या राशीच्या विवाहेच्छूना विवाहयोग येणे संभवते. प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील. नवे स्नेहसंबंध जुळून येतील. अर्थलाभ होईल. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहू अनारोग्यकारक होईल व त्याच्यामुळे वाममार्ग धन मिळविण्याची इच्छा प्रबळ होईल. येथील हर्षलही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून त्याच्यामुळे प्रवासात मनस्ताप, मानहानी होणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर शिवशंकराची व दुर्गादेवीची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने ”शिवलीलामृत स्तोत्रा”चे आणि “दुर्गादेवी स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी “ओम सूर्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतू असून तो सुख व ऐषाराम देणारा असला तरी तो वाहनधोकादायक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. वाहन सावधानतेने, नियंत्रित वेगातच चालवा. य राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत रवि असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे भांडणे होणे संभवते. तसेच वित्तहानी झाल्यास आर्थिक समस्या अस्वस्थ करतील. त्याशिवाय डोळ्याचे दुखणे होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो पूर्णपणे अनुकुल होईल व सर्व सुख, धन, आरोग्य लाभेल. नोकरीत वरिष्ठ तुमच्या कामावर प्रसन्न होतील. त्यातून काही मंडळींना बढती, पगारवाढ होणे संभवते. काही मंडळींचा सन्मान होण्याची शक्यताही दिसते. शिवाय क्वचित कोणास एखादे उच्च पदही मिळण्याची शक्यता दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी धनु राशीत प्रथमपासून बुध -शुक्र हे दोन ग्रह आहेतच. पैकी बुध महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे शत्रुभय अस्वस्थ ठेवील. नवे शत्रुत्व होणेही संभवते. पण शुक्र संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल व लाभदायक होईल. काही मंडळींचा सन्मान होईल; तर काहींना प्रतिष्ठा प्राप्त होईल. तसेच काही मंडळींना भूमिलाभ होणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत शनि असून त्याच्यामुळे दु:ख, नैराश्य येणे संभवते. तसेच गृहसौख्य हानी होण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अति भावनाशील होईल. पण तो अध्यात्म व गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत गुरु असून त्याच्यामुळे आरोग्य सुधारेल व काही मंडळींना नोकरचाकराचे सुख लाभेल. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून राहू वास्तुसुख बाधक होणे संभवते. तसेच त्याच्यामुळे मनात कपटी विचार प्रबळ होतील. जपा. शिवाय त्याच्यामुळे या राशीच्या विवाहित मंडळींच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करीतसे दिसते. हर्षलमुळेही दाम्पत्य जीवनात वाद, भांडणे, गैरसमज, कोणा एकाचे विक्षिप्त आचरण अशापैकी कारणांनी वैवाहिक सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून तो पूर्णपणे प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, हाडमोड होणे संभवते. शिवाय तो जलभयकारक व वीजभयकारक असल्याने खोल पाण्यात पोहू नका. तसेच विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती आणि मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा” चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र

स्वाती आहे त्यांनी “ओम वायवे नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, मनस्ताप, आर्थिक चिंता, वित्तहानी अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या धनस्थानी धनु राशीत प्रथमपासून बुध -शुक्र हे दोन ग्रह आहेतच. येथील शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक प्रगती होईल व सुखसमाधान लाभेल. तसेच धनलाभही होईल. पण येथील बुधामुळे धनलाभ होणार असला तरी तो दु:खदायक होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत शनि असून त्याच्यामुळे काही मंडळींना अपेक्षित अशी उत्तम नोकरी मिळेल; तर काहींना आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे घरगुती परिस्थितीत गैरसमज, घोटाळे अशापैकी कारणांनी मन अस्वस्थ होईल. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत गुरु असून तो सर्व प्रकारे अनुकुल व लाभदायक असल्यामुळे सर्व या राशीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणात अपेक्षित प्रगती करता येईल. . या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत राहू आणि वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील राहू अनारोग्यकारक असला तरी या राशीच्या ज्या मंडळींचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध असेल त्यांना अशा संबंधामुळे लाभदायक गोष्टी प्राप्त होतील. पण येथील वक्री हर्षलमुळे या राशीच्या काही मंडळींना डोकेदुखीचा आजार होणे संभवते. तसेच या राशीच्या उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांनी सतत सखोल विचार करत बसू नये. नपेक्षा मेंदूविकाराचा आजार होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून त्याच्यामुळे या राशीच्या विवाहित मंडळींच्या जीवनात दोघांच्या किंवा एकाच्या अनारोग्यामुळे, दोघांतील वाद, गैरसमज, अन्य कटकटी अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते, ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे अशांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीच्या व्ययस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे स्वभाव लहरी होईल, श्रद्धा असेल तर “श्रीगणेश उपासना “ व “ श्रीहनुमान उपासना “ अनुकुल होईल व मन:शक्ती आणि मन:शांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा” चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी “ओम

मित्राय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी "ओम इंद्राय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या व्ययस्थानी वृश्चिक राशीत रवि असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत येत आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात तो प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्याच्यामुळे शरीरपीडा, मानभंग, विरोध, थकवा, अनारोग्य, ,मनस्ताप व अन्य चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत प्रथमपासून बुध-शुक्र हे दोन ग्रह आहेतच. पैकी बुधामुळे अपयश, अनारोग्य, मानहानी होणे संभवते. पण शुक्रामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुखसमाधान प्राप्त होईल व प्रगती होईल. आर्थिक लाभ होणेही संभवते. या राशीच्या धनस्थानी मकर राशीत शनि असून तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, कुटुंबात अनिष्ट घटना घडणे संभवते. शिवाय आर्थिक संकटे येणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल. पण तो गूढ संशोधन कार्यास अनुकुल आणि प्रगतिकारक होईल; तसेंच अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मन:शांती प्राप्त करणे शक्य होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत गुरु असून त्याच्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, काही मंडळींचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील; पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत राहू आणि वक्री हर्षल असून येथील राहूमुळे वैवाहिक व कौटुंबिक सुखात तसेच संततिसुखात बाधा येणे संभवते. शिवाय या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत विविध कारणांनी अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. येथील हर्षल कलापोषक आणि उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल असला तरी तो वक्री असल्याने अडचणी, अडथळे सहन करूनच प्रगतीसाठी प्रयत्न करावे लागतील. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून तो अनारोग्यकारकच होईल व त्याच्यामुळे इजा होणे, फोड येणे, अर्थहानी होणे, अपप्रचाराचा त्रास होणे, चोरी होणे अशा प्रकारच्या घटना घडणे संभवते. या राशीच्या लाभस्थासनी तुळा राशीत केतू असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे सुखोपभोग प्राप्त होईल, धनलाभ होणेही संभवते, नियोजित कार्यात यश मिळेल, आणि काही मंडळींना प्रवासयोग येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती आणि मन:शांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निर्ऋतये

नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम उदकाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत शनि असून तो अनारोग्यकारक होईल, नियोजित कार्यात अडथळे, अडचणी निर्माण होणे संभवते. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील, तसेच कौटुंबिक जीवनात कोणा प्रिय व्यक्तीशी दूरत्व निर्माण झाल्यास मन अस्वस्थ होईल. जपा. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे विविध प्रकारे आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत गुरु असून तो या राशीच्या लेखकवर्गाला अनुकुल होईल, प्रवासाचे योग येतील, पण एखाद्या भावंडाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहूमुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. येथील हर्षलमुळेही कोणाशी पटणार नाही, सतत तक्रारी करत राहाल, कशातही सुखसमाधान लाभणार नाही, आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही, वास्तुसुख मिळणार नाही. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून त्याच्यामुळे काही मंडळींना स्थावरसंबंधी चिंता त्रस्त करील, मुलांपैकी कोणाचे अयोग्य आचरण, कोणाच्या अनारोग्याची चिंता अशापैकी कारणांनी संततिसुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. या राशीच्या दशम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याची तीव्र इच्छा अस्वस्थ करील. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून आहे ती नोकरीच मनापासून करावी. नपेक्षा "होत्याचे नव्हते होण्यास" वेळ लागणार नाही. जपा. या राशीच्या लाभस्थानी वृश्चिक राशीत रवि असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात नोकरी-व्यवसायात पूर्णपणे अनुकुल व लाभदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व शरीरपीडा, मानभंग होणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी धनु राशीत प्रथमपासून बुध-शुक्र हे दोन ग्रह आहेतच. पण येथील बुध महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अपयश, मानहानी, अनारोग्य होणे संभवते. पण शुक्र संपूर्ण महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल व सुखदायकच होईल. श्रद्धा असेल तर शिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः: " तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण

आहे त्यांनी “ओम विष्णवे नमः:’ तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अति कोमल होईल व संवेदना अति जलद होतील. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडल्यास मन उदास होईल व नैराश्य येईल. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत गुरु असून त्याच्यामुळे कुटुंबात शुभ घटना घडतील, नोकरी-व्यवसायात प्रगती होईल, उत्तम अर्थलाभ होईल. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून त्याच्यामुळे मन उदार, हरहुन्नरी होईल, हातून काही कर्तृत्व घडेल. पण त्याच्या- मुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. येथील वक्री हर्षलमुळे उच्च बौद्धिक कार्यशक्ती, आकलनशक्ती आणि स्मरणशक्ती प्राप्त होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून त्याच्यामुळे कुटुंबात गैरसमज, वाद, भांडणे होणे तसेच असमाधानकारक घटना घडणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे ढोंगी आचरण घडेल व संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत रवि असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायकच होईल. या राशीच्या लाभस्थानी धनु राशीत प्रथमपासून बुध -शुक्र हे दोन ग्रह आहेतच. ते दोन्ही ग्रह अनुकुल होतील व त्यांच्यामुळे सुखसमाधान लाभेल, अर्थलाभ व मित्रलाभ व कामसुख प्राप्त होईल व मन:शांती लाभेल. या राशीच्या व्ययस्थानी मकर राशीत शनि असून त्याच्यामुळे अनारोग्य होणे, मानहानी होणे, व संकटपरंपराच निर्माण होण्याची शक्यता दिसते. . त्यामुळे या काळात आर्थिक व्यवहार जपून, विचारपूर्वक व सावधानतेनेच करा,असे सांगावेसे वाटते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची आणि श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती आणि मन:शांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने ““शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः:’ तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी “ओम वरुणाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत गुरु असून तो शुभ होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, बौद्धिक, संशोधनात्मक व लेखनकार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल, प्रगतिकारक व

यशदायी होईल. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून राहूमुळे कौटुंबिक सुखात बाधा निर्माण होते संभवते. तसेच आर्थिक चिंता त्रस्त करतील. वक्री हर्षलमुळे मनस्थिती अति चंचल, अस्थिर होईल, अविचाराने खर्च कराल व आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे याचे भानही राहणार नाही. या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत वक्री मंगळ असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे हिंमत, महत्त्वाकांक्षा, वाढेल, कर्तृत्व सिद्ध होईल, पण तो वक्री असल्यामुळे सहजासहजी असे घडेलच याची खात्री देता येत नाही. प्रवास योग येणेही संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत केतू असून तो अनारोग्यकारक होईल. या राशीच्या भाग्यस्थानी वृश्चिक राशीत रवि असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या दशम स्थानी धनु राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो सर्व प्रकारे प्रतिकुलच होईल; पण महिन्याच्या उत्तरार्धात तो नोकरी वा व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या दशम स्थानी धनु राशीत प्रथमपासून बुध -शुक्र आहेतच. पैकी बुधामुळे धनलाभ व मित्रलाभ होणे संभवते. सर्व प्रकारे सुखसमाधान लाभेल. पण येथील शुक्र कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना प्रतिकुल होईल त त्यांच्या मार्गात अडचणी, अडथळे निर्माण होतील. या राशीच्या लाभस्थानी मकर राशीत शनि असून त्याच्यामुळे अर्थलाभ होईल;पण संततीपैकी कोणास कसला तरी असह्य त्रास होणे संभवते. या राशीच्या व्यय स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे चिंता,मानसिक व्यग्रता येऊन नैराश्य येईल. पण तो गुप्त पोलिसखात्यात कार्यरत असणारांना अनुकुल व उपयुक्त होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अहिर्बुध्न्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ओम पूषाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====○○○○○0○○○○○=====